स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२५—२६/२६९ दि. १५/०९/२०२५

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : नदीसाठी युवाशक्ती संघटन **(YARI-youth alliance for rivers)** या उपक्रमात आपल्या महाविद्यालयाने सहभागी होणेबाबत..

संदर्भ : १.नदी की पाठशाला फाऊंडेशन यांचे दि. ०९ सप्टेंबर २०२५ रोजीचे पत्र
२.मा.कुलसचिव यांचे कार्यालयामार्फत संदर्भ क्र.१ पत्र आवक क्र.व्हीसी/४६३७ दि.१२ सप्टेंबर २०२५ रोजी अग्रेषित

महोदय,

वरिल संदर्भ क्र. १ व २ पत्रानुसार नुकत्याच देशातील पर्जन्यवृष्टी आणि नद्यांचे जलस्तर त्यानुषंगाने नदीसाठी युवाशक्ती संघटन (YARI-youth alliance for rivers) या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते आहे. तरी सदर उपक्रमाचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत जोडले आहे. त्यानुसार आपण आपल्या स्तरावर उचित कार्यवाही करावी. कळावे, ही विनंती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबतः नदी की पाठशाला फाऊंडेशन यांचे पत्र

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक/जावक क्र.: 502
दिनांक 13 SEP 2025
शाखा-

# Nadiki Pathshala (DEDICATED FOR RIVER AND WATER)

नदी की पाठशाला फाउंडेशन

नदी विश्वस्य मातर:

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 12 SEP 2025
आवक क्रमांक व्हीसी 4637
जावक दिनांक 12 SEP 2025

PIR NG
DIR BJJ
HOD Environmental Sci
HOD Botany

nadikipathshala @gmail .Com

डॉ सुमंत पांडे 9764006683

दिनांक :9-09-2025

प्रति,

माननीय कुलगुरू,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे.

विषय: <u>नदीसाठी युवाशक्ती संघटन अर्थात (YARI- youth alliance for rivers) या उपक्रमात आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना/शैक्षणिक संस्थांना सहभागी होण्यास्तव आवाहन करणे बाबत.</u>

संदर्भ : 1.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

2.उन्नत भारत अभियान आणि उन्नत महाराष्ट्र अभियान.

3. चला जाणूया नदीला आणि महाराष्ट्र शासनाचे तत्सम शासन निर्णय

माननीय महोदय.

नुकत्याच देशातील पर्जन्यवृष्टीमुळे सुमारे 22 नद्यांचे जलस्तर हे धोकादायक पातळीपेक्षा वरती आल्याचे केंद्रीय जल आयोगाने स्पष्ट केलेले आहे. महोदय नद्या या जीवन वाहिन्या आहेत. आपली प्राचीन संस्कृती नदीच्या काठीत स्थिर झाली आणि बहरली हे सर्वज्ञात आहे. जगातील ज्या समकालीन सभ्यता निर्माण झाल्या त्यापैकी आपल्या देशातील सिंधू संस्कृती ल सभ्यता मानली जाते. ज्यालाही सुमारे 5000 वर्षापेक्षा अधिक कालावधी लोटलेला आहे. थोडक्यात नद्या आपल्या व्यक्तीपासून राष्ट्राच्या उन्नती साथी महत्त्वाचा धागा आहे. व्यक्तीची राज्याची आणि देशाची उन्नती आणि अर्थशास्त्र मध्ये नदीच केंद्रस्थानी आहे.

तथापि मागील काही कालावधीमध्ये नद्यावर झालेले आघात आणि त्यामुळे होत असलेले परिणाम हे अत्यंत गंभीर आहेत. हवामान बदलामुळे होत असल्या असलेल्या तापमान वाढ वाढलेली पर्जन्य वृष्टी आणि इतर बाबींचा सर्वच क्षेत्रावर विपरीत परिणाम होतो आहे. नद्यांचा जलस्तर वाढणे पूर परिस्थिती निर्माण होणे पर्जन्याच्या विचलनामुळे दुष्काळग्रस्त परिस्थितीची वारंवारिता देखील वाढलेली आहे. परिणामी ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतर सातत्याने वाढत आहे.

देशातील औद्योगिक वाढ देखील झपाट्याने होते आहे. या सर्व बाबींमुळे पाण्याची मागणी वाढलेली असून उपलब्धता आणि मागणी यामध्ये तफावत निर्माण होते आहे आणि जलस्त्रोतांवर प्रचंड ताण येतो आहे. तद्वतच बदलत्या जीवनशैलीमुळे याचे परिणाम नदी आणि जलस्त्रोतांमध्ये होत आहे. भूजलाचा उपसा गौण खनिज आणि त्याचा वापर या सर्वांचा एकत्रित परिणाम नद्यांची आरोग्य कमालीचे बिघडण्यात होतो आहे. आणि याचा थेट परिणाम मानवी आरोग्याशी होत आहे.

पीक पद्धतीवर झालेला बदल कृषी क्षेत्रात होत असलेल्या रसायनाचा खताचा बेसुमार वापर यामुळे खांद्यांनाच प्रत घसरून नवनवीन आजार सामोरे येत आहेत. ज्यामुळे आपली युवाशक्ती देखील आरोग्याच्या गंभीरतेच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेली आहे.

**विकसित महाराष्ट्र नद्या आणि युवा शक्ति**: 2047 साली विकसित भारत हे उद्दिष्ट आपल्या देशाने निर्धारित केलेले आहे यामध्ये दोन महत्त्वाचे साधन आहेत एक जलस्त्रोत, पर्यावरण जैवविविधता आणि दुसरे मानवी संसाधन. दोन्हीही अबाधित राहिली तर देशाची उन्नती निश्चित आहे असे समजावे लागेल. देशामधील असलेल्या युवांची शक्ती हीच देशाच्या उन्नतीचा मार्ग आहे. तथापि नदी आणि जलस्त्रोतांच्या होत असलेला ऱ्हास हा चिंतेचा विषय आहे. म्हणून नद्या च्या संवर्धनासाठी समाजातील युवा शक्ति प्रज्वलित होणे गरजेचे आहे. म्हणून नद्यासाठी युवा शक्ति संघटन महत्वाचे ठरते.

महोदय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे कृष्णा नदीच्या खोऱ्यांमध्ये येते. अप्पर भीमा नदीच्या खोऱ्यात बहुतांश भाग येतो सर्व साधारणपणे 28 नद्या यात समाविष्ट आहेत. भीमा नदीच्या पात्रामध्ये देखील प्रदूषण शोषण आणि अतिक्रमणाच्या समस्या गंभीर झाल्या आहेत.

भीमा नदीच्या उगमापासून ते भीमा नदीचा आणि कृष्णा नदीचा संगम पर्यंतचा भूभाग आणि त्या भूभागामध्ये असलेल्या शाळा महाविद्यालयांमधून नदीसाठी युवाशक्ती संघटन अर्थात

यूथ अलायन्स फॉर रिवर्स हा उपक्रम आम्ही प्रस्तावित करत आहोत या उपक्रमाची माहिती देणारे सविस्तर टिपण सोबत जोडलेले आहे कृपया त्याचे अवलोकन व्हावे.

- **आपणास विनंती आहे की सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत येत असलेल्या महाविद्यालय आणि शैक्षणिक संस्था यांना या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आपल्या स्तरावरून सुचित करण्यात यावे.**
- महाविद्यालयाच्या क्षेत्रामध्ये असलेल्या जलस्त्रोत आणि नदी यावर अभ्यासासाठी युवकांची निवड करण्यात यावी.
- महाविद्यालयांमध्ये नदी युवाशक्ती संघटन या विषयासाठी एक पर्यावरण शास्त्र विभाग अथवा भूमी विभाग अथवा इतर विभागामधील स्वयंस्फूर्तीने तयार असलेल्या अध्यापकाला याची जबाबदारी देण्यात यावी
- या अध्यापकांनी आपल्या महाविद्यालयातील विविध शाखांमधील विद्यार्थी विद्यार्थिनींना या अभियानात सहभागी होण्यासाठी आवाहन करावे आवाहन करताना त्यांची स्वयं स्वयं प्रेरणा आणि स्वयं स्फूर्ती हे महत्त्वाचे घटक आहेत हे समजावून सांगावे.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार त्यांना आवश्यक असल्यास आवश्यक तेवढे क्रेडिट या माध्यमातून प्राप्त करता येते.
- यासाठी अभ्यासक्रम तयार करणे प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक हे नदी की पाठशाला यांच्या माध्यमातून देण्यात येतील.
- या युवकांचे सहाय्य घेऊन प्रत्येक महाविद्यालयामध्ये शैक्षणिक संस्थांमध्ये शाश्वत स्तरावरचे नदीवर काम करणारे युवकांचा गट ज्याला रिवर क्लब असेही म्हटले जाते स्थापन करण्याबाबत सूचना देण्यात यावी.

अधिरस्त।

आपणास विनंती आहे की आपल्या ~~आधी न~~सता असलेल्या महाविद्यालयाची संबंधित विभागाची एक ऑनलाईन बैठक आयोजित केल्यास नदी की पाठशाला, चला जाणूया नदीला आणि डॉक्टर राजेंद्रसिंह हे संयुक्तपणे उपस्थित राहून त्यांना संबोधित करू शकतील.

आपणास विनंती आहे की संबंधित महाविद्यालयाला सोबत जोडलेल्या माहितीपत्रक पाठवून योग्य ते निर्देश देण्याची विनंती आहे.

त्याच प्रमाणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठानंतर भीमा नदीवर सोलापूर येथील अहल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र येते सबब आपल्या स्तरावरून मा.कुलगुरू सावित्री अहल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ यांना देखील आपल्या स्तरावरून या उपक्रमात सहभागी होण्याबाबत कळविण्याची नम्र विनंती आहे.

आदरपूर्वक.

आपले नम्र

**डॉक्टर सुमंत पांडे** **डॉक्टर श्रीनिवास वडगबाळकर** **डॉक्टर अजित गोखले**

**श्री नृसिंह मित्रगोत्री** **श्री राजेंद्र पवार**

**श्री शुभम बगाटे**

# नदीकी पाठशाला

---

*नदीसाठी युवाशक्ती संघटन*
*युथ अलायन्स फॉर रिव्हर.*
**Youth Alliance for Rivers**
*YARI*

---

नदीसाठी युवांचं संघटन युथ अलायन्स फॉर रिव्हर. YARI

उद्देश:

१. अप्पर भीमा खोरे : भीमा नदीच्या उगमापासून ते सोलापूर जिल्ह्यातून नदी बाहेर जाईपर्यंत च्या क्षेत्रातील शिकणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांच्या/ युवकांच्या माध्यमातून अभ्यास करावा असा उद्देश आहे.

2. युवकांना युवतींना या प्रश्नाकडे बघण्याची एक वेगळी दिशा प्राप्त होईल

3. आणि त्यांच्या पुढील आयुष्यामध्ये जेथे जेथे ते काम करतील त्या त्या ठिकाणी या बाबींची जाणीव त्यांना राहील.

कृती:

१. या अभ्यासामध्ये संबंधित महाविद्यालय ज्या विद्यापीठाच्या अंतर्गत येतात त्या विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या माध्यमातून एक लेखी निवेदन अथवा पत्र संबंधित कॉलेजला जायला हवे.

2. महाविद्यालयातील व्यवस्थापनाने हा विषय अभ्यासाला मुलांसमोर ठेवतील.

3. ज्या विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांना नदी विषयी अभ्यासाची इच्छा आहे आणि समर्पणाची भावना आहे अशांनी तो विषय निवडावा

4. विषय निवडल्यानंतर त्यांना अभ्यासाठी देता येईल असा कालावधी त्यांनी ठरवावा आणि

5. त्या कालावधीमध्ये निश्चित असा अभ्यास करावा.

NKP_YARI

6. केलेल्या अभ्यासाचे निष्कर्ष आणि अभ्यास अहवाल त्यांच्या शाळेतील मेंटर अथवा गुरुच्या माध्यमातून त्यांनी नदी की पाठशाला कडे पाठवावे आणि

7. त्या अहवालाचा विश्लेषण एकत्रितपणे करणे.

8. त्यातील कृती योग्यता ही संबंधित विभागांना, शासनांना, संबंधित प्राधिकरणांना कळवावे.

9. जेणेकरून स्थानिक समस्या आणि त्यावर स्थानिक उपाय काय असावेत यासंदर्भामध्ये दिशादर्शन होऊ शकेल.

10. युवकांना युवतींना या प्रश्नाकडे बघण्याची एक वेगळी दिशा प्राप्त होईल आणि त्यांच्या पुढील आयुष्यामध्ये काम करतील त्या त्या ठिकाणी या बाबींची जाणीव त्यांना आयुष्यभर राहील असे मत आहे.

**विद्यापीठ**

अ .सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि

आ.अहल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ या दोन विद्यापीठातल्या महाविद्यालयांना यामध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन करणे.

यासाठी Centre for Sustainable Development -गोखले इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिक्स सोबत असेल.

*(इतर शासनाचे विभाग आणि संस्था ज्यांचा यात सहभाग असावा त्यांची यादी परिशिष्टामध्ये.)*

**विषय आणि त्यांची व्याप्ती.**

अप्पर भीमा खोऱ्यातील नद्यांच्या समस्यांवर युवकांच्या माध्यमातून अभ्यास करताना निवडले जाणारे विषय बहुआयामी व शास्त्रशुद्ध असावेत. त्यामुळे अभ्यासातून पर्यावरणीय, सामाजिक, आर्थिक आणि कायदेशीर चित्र स्पष्ट होईल. खालीलप्रमाणे विषय निवडता येतील

**१. प्रदूषणाशी संबंधित विषय**

- औद्योगिक प्रदूषणाचा परिणाम - नदीकाठच्या साखर कारखान्यांमधून, लघुउद्योगांमधून सोडले जाणारे रासायनिक व सांडपाणी.
- गावांमधील सांडपाणी व्यवस्थापन - नाल्यांमधून नदीत मिसळणारे असंशोधित पाणी.

- कृषी रासायनिक प्रदूषण - कीटकनाशके, खते व प्लॅस्टिक मल्चिंगमुळे नदीपात्रातील पाण्याची गुणवत्ता.
- घनकचरा व्यवस्थापन - नदीकाठावर टाकला जाणारा प्लास्टिक, घरगुती कचरा.

२. **अतिक्रमण व भूवापर विषय**

- नदीपात्रातील बेकायदेशीर बांधकामे व वसाहती. WRD
- वाळू उपसा व त्याचे परिणाम - पर्यावरणीय समतोलावर प्रभाव.DCR /Police
- नदीकिनारी शेती व बेकायदेशीर शेततळी - प्रवाहातील बदल, जलप्रवाहात अडथळे.

३. **पर्यावरणीय विषय**

- पाण्याची गुणवत्ता तपासणी - भौतिक, रासायनिक व जीवशास्त्रीय तपासणी (pH, BOD, COD, DO, कोलिफॉर्म बॅक्टेरिया). GSDA/Health
- जलचर जैवविविधतेवरील परिणाम - माशांचे प्रकार, जलवनस्पती, इतर जीवजंतू.
- नदीतील नैसर्गिक प्रवाहाचा अभ्यास - धरणे, बंधारे यामुळे बदललेला प्रवाह.a
- हवामान बदलाचा परिणाम - दुष्काळी चक्र, पाणी उपलब्धता.

४. **सामाजिक-आर्थिक विषय**

- नदी व लोकजीवन - पिण्याचे पाणी, सिंचन, मासेमारी, धार्मिक-सांस्कृतिक उपयोग.
- नदी प्रदूषणाचा सार्वजनिक आरोग्यावर परिणाम - पाण्यातून पसरणारे आजार.
- स्थानिक लोकांचा सहभाग - नदी स्वच्छता, नदीउपयोगाबाबत लोकांचे दृष्टिकोन.

५. **प्रशासन व धोरण विषय**

NKP-YARI

- शासकीय योजनांचा परिणाम - जलयुक्त शिवार, नदी पुनर्जीवन, नमामी गंगे योजना.
- कायद्याची अंमलबजावणी - पर्यावरण संरक्षण कायदा, नदीकिनारी झोनिंग नियम.
- स्थानिक स्वराज्य संस्था व ग्रामपंचायतींची भूमिका.

**अभ्यासाच्या पद्धतीसाठी सूचना**

1) पाणी नमुने घेऊन लॅब तपासणी.
2) सर्वेक्षण प्रश्नावली - ग्रामस्थ, शेतकरी, कारखानदार, विद्यार्थी.
3) GIS व मॅपिंग - नदीपात्र, अतिक्रमण नकाशे.
4) केस स्टडी पद्धत - काही गावांचे सखोल अभ्यास.

NKP - YARI

## परिशिष्ट - १

### अप्पर भीमा खोऱ्यातील नद्यांवरील अभ्यास विषय

थीम सविस्तर विषय

१. **प्रदूषण** -

- औद्योगिक सांडपाणी (साखर कारखाने, लघुउद्योग)
- गावांमधील असंशोधित सांडपाणी
- रासायनिक खते व कीटकनाशकांचा पाण्यावर परिणाम
- नदीकाठचा घनकचरा व प्लास्टिक प्रदूषण

२. **अतिक्रमण व भूवापर**

- नदीपात्रातील बेकायदेशीर बांधकामे
- वाळू उपसा करणे आणि त्याचे परिणाम
- साचलेली वाळू उपसा न करण्यामुळे होत असलेले परिणाम
- बेकायदेशीर नाले ओढे व शेती अतिक्रमण
- नदी किनारी बदललेला जमीन वापर
- क्षारपड जमिनीच्या समस्या

३. **पर्यावरणीय पैलू** -

- पाण्याची गुणवत्ता (pH, BOD, COD, DO, कोलिफॉर्म )
- जलचर जैवविविधतेवर परिणाम (माशांचे प्रकार, जलवनस्पती)
- धरणे/बंधारे यामुळे बदललेला प्रवाह
- हवामान बदलामुळे पाणी उपलब्धतेतील बदल

४. **सामाजिक-आर्थिक पैलू**

- लोकजीवनातील नदीचे महत्त्व (पिण्याचे पाणी, सिंचन, मासेमारी)
- पाण्यामुळे होणारे आरोग्याविषयी प्रश्न

- धार्मिक-सांस्कृतिक उपयोग
- नदी स्वच्छतेत लोकसहभाग

५. **प्रशासन व धोरण** -

- शासकीय योजना (जलयुक्त शिवार, नमामी चंद्रभागे , नदी पुनर्जीवन)
- पर्यावरण संरक्षण कायदा व झोनिंग नियमांची अंमलबजावणी.
- ग्रामपंचायत व स्थानिक संस्थांची भूमिका.
- नदी व्यवस्थापनातील अडचणी

☛ वरील प्रमाणे प्रत्येक विषयावर महाविद्यालयीन विद्यार्थी स्वतंत्र गट करून प्रोजेक्ट स्टडी / फील्ड सर्वेक्षण / केस स्टडी करू शकतील.

ही प्रश्नावली विद्यार्थी गावातील लोक, शेतकरी, कारखानदार, मासेमार, ग्रामपंचायत सदस्य इत्यादींकडून माहिती गोळा करण्यासाठी वापरू शकतात.

NKP - YARI

संभाव्य प्रश्नावली :

**अप्पर भीमा खोऱ्यातील नद्यांवरील समस्या अभ्यास**

१. उत्तरदाराची माहिती

1. नाव (ऐच्छिक): ____________________

2. वय: ________ लिंग: ☐ पुरुष ☐ महिला

3. व्यवसाय: ☐ शेतकरी ☐ मासेमार ☐ कामगार ☐ कारखानदार ☐ विद्यार्थी ☐ अन्य

4. शिक्षण: ☐ निरक्षर ☐ प्राथमिक ☐ माध्यमिक ☐ उच्च माध्यमिक ☐ पदवी ☐ पदव्युत्तर

---

२. नदीशी असलेला संबंध

5. आपल्या गावाजवळ कोणती नदी वाहते? ____________________(नदीचे नाव/तिचा उगम आणि संगम /नदी खोरे कोणते

6. आपण नदीचा वापर कशासाठी करता?

☐ पिण्याचे पाणी

☐ सिंचन

☐ मासेमारी

☐ जनावरांचे पाणी

☐ धार्मिक/सांस्कृतिक कार्य

☐ अन्य ___________

३. **प्रदूषणाविषयी प्रश्न**

7. **आपल्या मते नदीतील प्रदूषणाचे मुख्य स्रोत कोणते आहेत?**



NKP-YARI

☐ औद्योगिक सांडपाणी

☐ गावातील नाले

☐ शेतीतील खते/कीटकनाशके

☐ घरगुती कचरा/प्लास्टिक

☐ अन्य ______

**8. नदीतील पाण्याच्या गुणवत्तेत गेल्या १० वर्षांत बदल जाणवतो का?**

☐ हो

☐ नाही

☐ नक्की सांगता येत नाही

**9. प्रदूषणामुळे आपल्या गावात/घरात आरोग्यविषयक समस्या (उदा. त्वचारोग, पोटाचे आजार, इतर ) दिसून आल्या आहेत का?**

☐ हो

☐ नाही

## ४. अतिक्रमण व नदीपात्र

**10. आपल्या परिसरात नदीपात्रात अतिक्रमण झाले आहे का?**

☐ हो

☐ नाही

**11. वाळू उपशामुळे नदीचा प्रवाह बदलतो/पाणी कमी होते असे वाटते का?**

☐ हो

☐ नाही

12. नदीपात्रात अन्य ठिकाणाहून वाळू वाहून आलेली आहे काय?

☐ हो

☐ नाही

NKP - YARI

13 आली असल्यास त्याचा पुराच्या वारंवारितेवर परिणाम होतो काय ?

☐ हो

☐ नाही

५. सामाजिक-आर्थिक परिणाम

12. नदीमुळे आपल्या गावातील अर्थव्यवस्थेला कितपत फायदा होतो?

☐ खूप

☐ थोडा

☐ अजिबात नाही

14. प्रदूषण/अतिक्रमणामुळे आपली उपजीविका (शेती/मासेमारी) प्रभावित झाली आहे का?

☐ हो

☐ नाही

---

६. **प्रशासन व उपाययोजना**

14. आपल्या गावात नदी स्वच्छतेसाठी कोणते प्रयत्न झाले आहेत?

☐ ग्रामपंचायत

☐ शासकीय योजना

☐ NGO/लोकसहभाग

☐ कोणतेही नाही

15. नदी पुनर्जीवनासाठी आपण काय करावे असे सुचवाल? ____________________

ही प्रश्नावली स्थानिक गरजेनुसार सुधारता येईल. विद्यार्थ्यांनी १०-१५ मिनिटांत भरता येईल अशी संक्षिप्त ठेवावी आणि आवश्यक तेथे खुल्या प्रश्नांचा (open-ended) वापर करावा.

NKP-YARI

## परिशिष्ट 2

### या मध्ये सहभागी होणारे शासकीय विभाग आणि संस्था

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.(अधिनस्त महाविद्यालये)
- अहल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ. (अधिनस्त महाविद्यालये)
- गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था (अभिमत विद्यापीठ)
- यशदा पुणे
- नमामि चंद्रभागे. (पुणे विभागीय आयुक्त)
- न्यायिक अधिकारी प्रशिक्षण संस्था नागपूर. JOTI (Judicial Officers Training Institute) Nagpur.आणि महाराष्ट्र न्यायिक अधिकारी प्रबोधिनी उत्तन ठाणे इतर विधी महाविद्यालये.
- हवामान बदल व पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन मुंबई.
- जलसंपदा, जलसंधारण/ग्रामविकास विभाग, नगर प्रशासन.
- MITRA (Maharashtra Institute for Transformation)
- उन्नत महाराष्ट्र अभियान (उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन /आयआयटी मुंबई)
-

NKP - YARI